


म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2326

REFBK-0021993
REFBK-0021993

वि. क्र.
२३२८

२१९९३
११।११।८८
३१०१

# पहाट

२३२८ का०य
२१९९३

नीळकंठ
महाजन

REFBK-0021993
REFBK-0021993

नीलकमल
प्रकाशन
पिंप्राळे

पहाट :
नीळकंठ महाजन
प्रथमावृत्ती
२५ मार्च १९७७

प्रकाशक :
सौ. कमल महाजन
नीलकमल प्रकाशन
पिंप्राळे
जळगांव

© नीळकंठ महाजन

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव
पुणे ३०

किंमत आठ रुपये

मुखपृष्ठ :
उत्तम कोळगावकर

प्रा. प्रभाकर श्रावण चौधरी
आणि माझे काका
बापूसाहेब सोना लाळू महाजन
यांना

ऋणनिर्देश :

ना. धों. महानोर, शान्ता ज. शेळके, राम पटवर्धन, राजा महाजन, सुशिल, उत्तम कोळगावकर, हेमलता अंतरकर, अशोक सोनवणे.

श्रेय :

सत्यकथा / प्रतिष्ठान / युगवाणी / अस्मितादर्श / मराठा
राजस / हंस / ऋचा / महाराष्ट्र टाईम्स
मुंबई व पुणे आकाशवाणी

# अनुक्रम


पहाट ९
आठवणींचा किडा १०
वेषांतर ११
ती जात्यात टाकते १२
कावळा १३
होकार १४
चिथावणी १५
मी चाललोय रस्त्यानं १६
मिसळणे १७
ग्रीष्म १८
जाग १९
अधांतर २०
माणसं २१
अशावेळी २२
तर मी माझ्याच कडून २३
हात २४
धावपळ २५
शाळा २६

नागरीक नावाचा
राजा २७
वादळ २८
निरोप २९
पानं हलतात ३०
भेट ३१
दुपार ३२
रात्रीला..! ३३
कर्ज ३४
नीरवता ३५
रस्ता ३६
कुठपर्यंत ३७
नियतीच्या
हातांनी ३८
नांगरलेले डोळे ३९
गाणे ४०
तुझ्या व्यथांचे
गाणे ४१
सावली ४२
नशीब ४३
झाड ४४
परंपरा ४५
निमित्त ४६

| | | | |
|---|---|---|---|
| पेरले गर्भात | ४७ | अंधाराच्या आडोशाला | ५६ |
| आपण सारे | ४८ | कुठे ! | ५७ |
| दुःख मलूल गाणे | ४९ | सूड | ५८ |
| सूर्याचं बोट | ५० | निर्माता | ५९ |
| तारुण्य | ५१ | भुकेला मारुती | ६० |
| धूळ | ५२ | खामोशी | ६१ |
| चतन्याचं लेणं | ५३ | अफवा / पाऊस | ६२ |
| गाणे | ५४ | चित्र | ६३ |
| उच्छ्वास | ५५ | तुझे डोळे आठवतात | ६४ |

आपण अगदी गप्प असावं ६५
ती येतें ६६
माझा पत्ता ६७
घर ६८
तो कुठेही नसतों ६९
डोळयांवर डोळे ७०
मृत्यू ७१
अभिनय ७२

कीर्ति ७३
तंग तारांचे कुंपण ७४
चांदणे / कंदील डोळे ७५
कावळे / मी . स्तन / तू ७६
वेण्या / जेव्हा तू ७७
आरसा / प्रेयसीचे प्रश्न ७८
सळसळ / दोन अश्रु ७९
झाडाखाली, कधी कधी ८०

कुणीतरी चालत आहे आपल्यामागे
असा नुस्ताच भास
मागे वळून पाहिलं तर....जास्तच भितीची पूड
डोळ्यांत उधळतो अंधार.

पाहायचे तरी मागे काय? ते बुडून गेलेले रस्ते?
की तुला हरवून आलेलो शहर?

पहाट

त्या शहरातून तर कुणी आलं नसेल ना मागे?
भूतकाळाच्या कहाणीवर लेटतांना दिवस
भानावर होतो का आपण?

मागे चालत आहे कुणीतरी असा नुस्ताच भास.
काहीतरी बोलायला हवे भीती घालवण्यासाठी.

मिटलेल्या कळ्यांच्या अनोळखी रानात
फुलं मागतांना
नाव तुझं तेवढं येतं ओठांवर
मागे वळून पाहिले तर....

तुझ्यासारखीच पसरलेली पहाट असते
आकाशभर.—

## आठवणींचा किडा

ती प्रथम दरवाजात उभी राहून
सूर्य पाहून घेते उगवलेला
नंतर अंथरूणातल्या माणसाला
जागे करून पहाते
तेव्हाच कपाळावर कुंकू लावून भांग भरते.

सूर्य पुढे पुढे येत असतो अंगणात
ती मात्र खोल खोल बुडत असते काळोखात.
दिवसाच्या प्रकाशाआड
सुन्या सुन्या वाटांसारखी
मनावर पुन्हा एका आठवणीचा किडा
चालत असतांना सूर्यासारखा.

## वेषांतर

कळत नाही असे
नेहमी नेहमीच का होते ?
सहज वळून पाहिले तर
दिवसाच्या पायाशी
संध्याकाळ शरण येते.

कळत नाही अशी
रोजच का संध्याकाळ
दिवसाला मरण मागत असते
सहज वळून पाहिले तर
रात्र विझून विझून गाते.

कळत नाही अशी
काळाहून काळी रात्र ही
का सूरांचे सरण मागते
सहज वळून पाहिले तर
पहाट : तुझे तिसरे वेषांतर असते.

## ती जात्यात टाकते

ती जात्यांत टाकते
आपल्या निःश्वासांतून
एक एक गाणे;
तिच्या त्याच स्पर्शासाठी
भरकड्यांत फिरतात.
माझ्यासारखे होऊन दाणे

ती वरवंट्याने
मिर्चीचे अंग घासते;
तिच्या हातातल्या चुड्याच्या
झिळमिळ गाण्याने
माझ्यासारखीच पाट्याचीही
निद्रा भंग होते

ती तापलेल्या तव्यावर अंग टाकून
कुठे कुठे दरवळते
तिच्या वक्षावर हात टेकून
माझ्यासारखीच पहाट उठते.

## कावळा

श्वास मोजता येत नाहीत म्हणून
मी जेवतांना घास मोजतो
छतावर कुणी कावळा....
चोच आदळतांना घरातून घराची सावली
बाहेर पडण्यासाठी धडपडत असते.

शेवटच्या उचक्या देणाऱ्या छपराला
थांब म्हणतात उमेदीसारखे खचलेले खांब
भिंतींच्या दुखऱ्या खांद्यांवरून
माती होऊन गळतो
वर्षानुवर्षांपासूनचा थकवा.

मी अंगणात उभा राहून
घराच्या सावलीला घरातच रहा म्हणतो
आणि छतावरच्या कावळ्याला
एक घास घालून आकाशात उधळतो

## होकार

जगतो म्हणून मारणारे
मरतो म्हणून जगवणारे
असतात मागेपुढे, आजुबाजूने
मी सावकाश इकडेतिकडे खालीवर
पहात आकाश चालतो रस्त्याने

मी स्वतःच डुंकून पहातो
डोक्यातल्या खोल विहिरीत
आणि ओरडतो निरर्थक 'हो ऽ ऽ' मोठ्याने
जरावेळ काळजात पाण्यासारखी हलते भीती
आणि घुमतच राहतो शरीरभर
विहिरीतला तो भेसूर होकार

मी गोंधळून इकडेतिकडे आजूबाजूने
खालीवर पहातो
आणि अंगावरची मूठभर माती
विहिरीत झोकून देतो.

## चिथावणी

माझ्या आत धुमसत असतं
एक शब्दांचं झाड
प्रथम धमन्यांचा शीणभाग शिलगावून
मला पेटवायचा असतो रक्तात आक्रोश
अन् उखडायची असते पायांखालची वाट.

मला उडून द्यायची असतात
दौतीतल्या शाईतली बंडखोर पाखरं
आणि शिंपडून टाकायचे असतात
लेखणीतले कत्तलीचे हुकूम

एवढ्यानंही थांबणार नसतो मी
मला तलवारी बनवायचे असतात
खच्चून भरलेल्या वेड्यांच्या सभागृहात
आणखी काही नवे हात.

मी टिपतोय डोळ्यांनी वृत्तपत्रातली
एक एक बातमी
माझ्या अंगभर ढेकर देतेय दहशत
चहुकडे आपल्याच तंद्रीत गुंग झालेले सुनेपण

## मी चाललोय रस्त्यानं

गर्दीही दिसत नाहीय रस्त्यावर
घरं मुकाट बंद आहेत लावून खिडक्या दारं
मघाशी विमान डोक्यावरून गेलं
तेही नको तितक्या खालूनच
विहिरीत पोहरा टाकला तर
पाण्याऐवजी पोहऱ्यात आलं रक्त

कुठूनतरी चारजण येतात
लष्करी कपड्यांतले
माझी तिरडी उचलून खांद्यावर घेतात
हेही वाचतोय मी वृत्तपत्रात.

सभोवती आपल्याच तंद्रीत गुंग सुनेपण
मी चाललोय रस्त्यानं

## मिसळणे

सक्त सशस्त्र पहारे बसले आहेत
माझ्याभोवती दबा धरुन
अधुनमधून हवेवर गोळ्या थुंकताहेत
बंदुकांच्या नळ्या
माझ्या जखमी झालेल्या प्रत्येक श्वासावर
अक्राळ विक्राळ हास्य करतोय सर्वनाश

मी लपवतोय स्वतःला काळोखात
कुणीही नाहीय आसपास
फक्त ठिकठिकाणी झाडांनी उंडून दिलेली
फुलं बेशुद्ध
सक्त सशस्त्र पहारे शोधताहेत मलाच.

मी तडफडतोय नियतीनं अकाली—
विझवलेल्या डोळ्यांत.
माझ्या हुंदक्यांचे थेंब ठिबकताहेत
अधांतरावर....

मला ऐकू येतोय असंख्य पावलांचा
आवाज माझ्याकडे येणारा
आम्ही मिसळतोय एकमेकांत
सक्त सशस्त्र पहारे कुठे आहेत ?

## ग्रीष्म

दूरपर्यंत पसरलेला वैताग समुद्रासारखा
वेलींवर, फुलांवर, झाडांवर, माणसाच्या हाडांवर
मागे वळून न पहाणारा हिरवा शहाराही
दूर दिशांपार निघून अदृश्य.

आकाशातून फेकलेल्या जाळ्यासारख्या
उन्हाच्या स्पर्शकळा जाणवताहेत
छातीतून, मातीतूनही.

जगण्याचीही माती होतेय की काय ?
तातडीने उचलावेत पाय
आणि शिरावे एखाद्या गावाच्या
श्वासातून आत....
पण डोक्यावरच्या मोळीत बांधलेले हात
पेट घेत आहेत.

घर पाहतय ढुंकून दुसऱ्या घरात
मन डोकावतय माझं दुसऱ्या उरात

येतो खमंग वास वाऱ्यासोबत
मांस तळल्याचा
तेव्हा काळ लावतो काळजावर
सुऱ्यांना धार

**जाग**

उडतात ठिणग्या डोळ्यांतून
घर पाहतय दुसऱ्या घरात ढुंकून.

ती येते पण वेळ टाळून
दारात उभा असतो हात पसरुन
अंधाराचा भास
डोळ्यातल्या ठिणग्यांची पाखरं होतात
आणि भोवतालच्या भिंती गायब
काळवंटतं आकाश
म्हणजे डोक्यावर नव्हतंच छप्पर

अचानक आगीतून येते जाग आतल्या आंतून
घर पाहतं माझं दुसऱ्या घरात ढुंकून.

## अधांतर

काळोखाला ओसरायची घाई होतेय
घाईतच आरवताहेत कोंबडे
खोपट्या खोपट्यातून ठिबकतेय
पंखाची फडफड
जाग पेटलीय माझ्याही काळजात

तू हात पुढे करतेस मूठ उगारलेली
मी थोपवणार असतो अजून
तुझ्या मुठीखालचा विध्वंस

हवेवर तरंगताना आपले चार डोळे
एकमेकांकडे चालत यायला
जमीन नसते पायांखाली

तुला आणि मला राहायला पुरते
हे अधांतर वाऱ्याएवढे

## माणसं

काही एक अर्थाअर्थी संबंध नसतांनाही
अज्ञातातून उडत येतो विचारांच्या पाखरांचा
करुण थवा आणि शिरतो डोक्यात माझ्या
पापण्या लवलवतात आणि डोळे होतात जड

मी पेलतोय डोक्यावर जणू हे आकाश
असेही वाटते क्षणभर
डोळ्यातल्या धुळीत लोळतात
पाखरांशी झालेले करार.

भेसूर सूर हेलकावतात सभोवती
वाऱ्याच्या अमर आस्तित्वानं.

पाखरं आपल्या पंखातले रंग झटकून
उडून जातात
डोळाभर माझ्या काळोखाचे ठिपके
काळीज खोदणारी माणसं होतात.

## अशावेळी

ओठांशी ओंजळ ओसंडत असते
तरी डोळे तहानेने असतात व्याकूळ

कितीतरीदां उचलून हात
होळी समजून उधळू पाहतो मी
फुलांनी भरलेली मूठ
कुण्या कोवळ्या कलिकेच्या साडीवर
कपाळावरही.

तर कोळशांच्या ढगांचे भ्रमर होतात
आकाश आणि डोळे विरघळतात
पायांखाली आपोआप

ऐकतो मी कुठेतरी तुला गाणी फुटल्याचे
अशावेळी उसवून जातात....
माझ्या पेटलेल्या ओठांवर मारलेले टाके.

## तर मी माझ्याकडूनच....

भिंतीवरल्या त्वचेच्या छिद्रा छिद्रांत लपलेले
माझे रक्त पिणारे ढेकूण
मी वेचून वेचून मारु शकलो
तरी दुबळं होणं थांबलं नाही माझं.

कानांशी किंकाळणाऱ्या डास मच्छरांचे
बळी घेतलेत शें-दोनशें
तेव्हा गजबलेले ठिकठिकाणी उंदरांचे
रस्तेही होते भू गर्भातील मार्गासारखे

मग मी जरा वरचा विचार करु लागलो
कि कां दुबळे होतोय आपण सारे ?

मग मला माणसं दिसू लागली
अशा रस्तांनी वापरणारी
स्वःतच्या सुरक्षिततेसाठी.
—तर मी माझ्याच कडून पोखरला जातोय

**हात**

डोळेच उठून जात नाहीत तर
समुद्र छाटले जातात पूर्ण
हातून हातच सुटत नाहीत फक्त आपले
तर अलग होतात जमिनीचे दोन तुकडे
आणि दरी होते
अनुभवांनी जोडलेल्या शतकाशतकांत
काळोखाधीन.

मी कुठेही उगवू देतो
मातीतून माझे पाय
तू कुठे टाकून जाणार असतेस
तुझे हात?

**धावपळ**

ती पुढे पुढे जातांना
गळत असतात झाडांची पानं रस्त्यानं
तिच्या पाऊलखुणांशेजारी अगदी स्तब्ध

ती गावात शिरते तेव्हा
धावपळ सुरु होते.
सर्वांगभर शैतान संचारल्यासारखी

मी तिला सावकाश
माझ्या घरात शिरू देतो
तेव्हाच वाऱ्यावर
माती लोटणं सुरू करतो.

## शाळा

घंटा घणघणतेय कधीही न थांबणारी
हृदयात माझ्या
आणि मेंदूत भरतेय आठवणींच्या
पोरांची शाळा
डोळ्यांत चिमुकल्या पावलांच्या ठशांची
फुलं होताहेत आपोआप
घंटेतून लटकताहेत माझे अधीर थोटे हात

मेंदूत धावताहेत पोरंच पोरं माझ्या
खट्याळ खोडकर खेळकर

घंटेत लटकलेले हात मी
तोडून घेतले तर ?
अदृश्य होईल हे धावणाऱ्या
कोवळ्या पायांचं जग
पोरांच्या सावल्या होतील
आणि मला बेत ठेवायला
नेमका काळोख निवडून काढता
येणार नाही.

## नागरिक नावाचा राजा

माझ्या हडकुळ्या डोळ्यांना
दिसताहेत लठ्ठ झाडे
मी स्वतःवर शिंपडतोय हुकूम मंतरलेले

मी नागरिक नावाचा राजा आहे.

माझ्या सावलीचा घेर मोजताहेत
मिठीत घेऊन सूर्याचे हात
माझ्या पायांखाली वाळवंटावर आलीय
उकळत्या भटकंतीला आगीची साय

साचताहेत डोक्यात डबकी विचारांची
पूर्वेचा थंड वारा बंड भरतोय
हृदयात माझ्या.

लाटांखाली कुणी तलवारी लपवून गेलंय म्हणे
माझ्याच साम्राज्यात
मी इथे तिथे चोहीकडे खोचीत चाललोय
तुझे–माझे–त्यांचे धगधगलेले
विखारी हात.

## वादळ

ही रात्रीची शिळी फुलं आवर
वादळांशी मुकाबला करणाऱ्या सतारीवर
नीरवतेच्या सुरांची कांबळ घाल.

सूर्य उगवणार आहे तुझ्यासाठीसुद्धां;
काळोखातलं काही एक दिसू द्यायचं नाही
म्हणून चेहरा जरा हसव

मी पाहतो विजा तुझ्या पायात
आणि मनात ढगांचा गडगडाट;
रोज रात्री माझेच डोळे वादळ होतात.

## निरोप

नुस्ती धावपळ चाललीय बायामाणसांची
डोक्यावर खांद्यावर काखेत सापडेल ते घेऊन

माझं निर्विकारपणे दार ठोठावणं चाललंय
रस्त्यावरच्या एका घराचं
हे घर कोणाचं ? अंधाराचं प्रकाशाचं
का मृत्यूचं ?

चाललंच आहे दार ठोठावणं नुस्तं
आतून कुणी बोलत नसतानाही

कुणी दार उघडावं
ये म्हटलं नाही तरी आत जावं
सरळ बैठकीत.
आरसा उचलून घ्यावा चेहेऱ्यासमोर
आणि स्वतःचं प्रतिबिंब न्याहाळीत सांगावं
मी घर रिकामं न करण्याचा
निरोप सांगायला आलोय.

## पानं हालतात

पानं हलतात हळूवार तेव्हा
मी सावली सावलीशी कान लावतो
तू काहीतरी बोलत असतेस....
नीरवतेच्या कफनातल्या वाऱ्यात प्राण येतो
आणि वाढतच जातो माझ्या हृदयात
पाखरांचा किलबिलाट
कुठेतरी हरवलेले असतात डोळे
मी हात उंच करतो
आणि कलहातून निसटण्याची शक्यता
खुडून घेतो अलगद्.

## भेट

आपण असं करू या
तू माझ्या डोळ्यात पहा
मी तुझ्या डोळ्यात पहातो

तू इथं अशीच थांब

मी तुझ्या डोळ्यात दूर निघून जातो
तू माझ्या डोळ्यात दूर निघून जा

माझ्यानं चालवलं जाईल
एवढ्या दूर जागा शोधून थांब
मी तुझ्यानं चालवलं जाईल
एवढ्या दूर जाऊन थांबतो.

## दुपार

चुलीची भांग भरतो
फुरफुरणारा जाळ

दारात तोंड खुपसून
राख उधळते गुलाल

चुड्याशी बोलता बोलता
भाकर होते गोलाकार

तिघांच्या नादी लागून
तव्यावर जळते दुपार

## रात्रीला . . . !

रात्रीला फुटतात काटे
निखाऱ्यांनी व्यापताना डोळे

आठवण गत दिवसांची
आपल्याच ओंजळीत
जन्म–मृत्यू आणि
पाप–पुण्य
झोकून देते परक्यासारखे

इथे शिळा होऊन
चारचौघात वावरायचे असते.

## कर्ज

भरलेल्या दिवसांना
मोजायला नाही माप
असे पावलोपावली
माथी झेललेले शाप

खूप होता साठलेला
दारी अंधार, प्रकाश
बैठकीत होते तेव्हा
अंथरलेले आकाश

अंगावर झाकलेले
हेच वस्त्रही कर्जाऊ
स्मशानात बसले ना
सारी गिधाडे बुडाऊ

**नीरवता**

काही दिवसच आपण आपल्याजवळ आहोत
असं समजून चालायचं;
उद्या स्वतःपासून कुठे हरवलो तर
ह्या गर्दीत शोधायची हौस
पावलांना असेलच असं नाही.

चारचौघात काढलेली ही स्वतःची मिरवणूक
सुखात गावभर फिरून येईलही
पण नीरवतेच्या शय्येवरची
सरणातली लाकडं
डोईजड होण्याआधी पेटतीलच असं नाही.

## रस्ता

खोदायचाय एक निर्जन रस्ता
ज्या रस्त्यानं वापरायला
सहसा कुणी धजणार नाही असा
कुत्रं मांजरंच काय
पण पशुपक्षीही फिरकणार नाहीत
असा रस्ता.

आकाश तर डोकावणार नाहीच.
पाताळापर्यंत रस्ता खोदायचाय.
हा तेवढ्यापुरता टिकणारा प्रकाश
नकोसा झालाय.

पाताळात फक्त काळोख असणार
काळोख तरी सातत्यानं साथ देतो काय
ते अनुभवायचंय़ी.

आपला शब्दही फुटून आला नाही
म्हणजे येतीलच शोधणारे.

आता नका भरून देऊ रे
माझ्या या चिमण्या ओंजळी
सूर्य विझवायला हमखास पुरणार नाही
डोळ्यातलं पाणी.

## कुठपर्यंत

कुठपर्यंत चघळीत बसणार
आपणच आपले मांस ?
कुठपर्यंत ओढीत नेणार
आपणच आपला नाच ?

कुठपर्यंत चोरून ठेवणार
आपणच आपले मढे ?
कुठपर्यंत जमीन शोधणार
टाकण्यासाठी मूठभर हाडे ?

कुठपर्यंत ठोकणार दार
आपणच आपल्या घराचे ?
कुठपर्यंत फेकाल अंधार
आपण आपल्या रस्त्यातला ?

कधीच नेईल चोरून घार
प्रेत आपल्या उरातले.

## नियतीच्या हातांनी

नियतीच्या हातांनी
कपाळावर कोरलेल्या ओळी
पायांना दाखवीत असतात
जीवनमरणाच्या वाटा.

कधी त्या सूर्याकडे झुकतात
तर कधी
पाखरांच्या पंखामध्ये नेऊन
आपल्याला असं
एकटं एकटं करून ठेवतात.

मग आकाश हरवल्यानं
अधाशासारखं आपण
वाळवंटं धुंडाळीत सुटतो
एका पाण्याच्या थेंबासाठी

अशा जगण्यातून
हरवायला हपापलेले पाय
समुद्र मागे टाकीत सुटतात
आणि एका नियतीच्या
काचेरी डोहात
स्वतःला न्याहाळताना
जियले सूर्य तिथेच फुटतात.

## नांगरलेले डोळे

सूर्याखाली भटकताना
ओलांडावे लागतात जेव्हा
बे- आकार दगडातील
मृतात्म्यांच्या शिल्पांचे
एकांतप्रीय घाट ....
तेव्हा झाडांची मैफल
पांखरांना खांद्यावर घेऊन
दाखवीत असते
युगानुयुगाचे भुकेले पारधी मोकाट
अशा मुक्कामाच्या ठिकाणी
सावल्यांच्या कानी
वाळवंटाची कहाणी
आभाळाला सांगत असताना
उन्हाळी ढग ....
नांगरलेल्या पावसाळी डोळ्यात
बरसत असतात.

## गाणे

पत्थराचे घास
अडकले गळा
पायातल्या छाया
पेटविती जळा.

आभाळही झाले
डोळ्यातले अश्रू
संपले ना दुःख
टाळताना मृत्यू

मेलेल्याच वाटा
स्मशानात जाणे
निनादावे कानी
आपुलेच गाणे

चारचौघात विकण्यासाठी
तुझ्या व्यथांचे गाणे
ओठ ठेचून घेतेस प्रथम तू
पानविड्यांनी.

प्रकाश उधळून डोळे तुझे
लपवतात काळोख
स्वतःच्या शापाचा.

**तुझ्या**
**व्यथांचे गाणे**

तुझ्या मनाची कदर न करणारे हात
खुडतात तुझे गाल
तुला वेळोवेळी वाचवत असतेस तू
पायांचे न चुकवता ताल.

तू गिरकी घेतेस आकाशासारखी
ओंडक्यांसारखे पाय
नाचतच जातात मनांच्या दर्यावर

कळत नाही का करून घेतेस तू
आतून बाहेरून स्वतःला दंश
तू एक जळती व्यथा आहेस
तुझा व्यथांचाच वंश.

## सावली

ती एक जळती सावली
स्वतःकडे येणाऱ्या प्रत्येकाला
मद्याचे पेले देताना
स्वतःला विझवू पहाते.

नंतर ती सर्रास
दरवाजेच उघडे करून ठेवते स्वतःचे

ती विझली असेल
असा गैरसमज करून
मावळत येणाऱ्या दिवसाप्रमाणे
लोक निघून जातात.

धरणं धरून रात्र बसलेली असली तरी
स्वप्नं येताना आवाज होत नसतात.

कुणीही कुणालाही स्वप्नात बोलावू शकतं
कुणीही कुणाच्याही स्वप्नात
काहीही घडवून आणू शकतं.

## नशीब

किती सोयीचं असतं
मनासारखं जगणं स्वप्नात ?

कधी मीच माझ्या इच्छांना
तुझा बळी देतो.
मला संयमी अंधार आवडतो.
त्याचा व्यभिचारही आवडतो मला.

अंधाराचा तुकडा माणूस होऊन
स्वप्नात येणं त्याहून आवडतं

अंधाराला माणसासारख्या
खस्ता खायला नशिब नसतं.

## झाड

पायांनी उलटली पृथ्वीशी टाचलेली चित्रे
मी चालत आलो त्यांच्यावरून ऋतुपरत्वे
आता हे सूर्यानं धगधगवलेलं म्हातारं वाळवंट
उलटलं जात नाहीय सहज

मी चाललोय निर्नाम कोऱ्या प्रदेशातून
ठिकठिकाणी उभे आहेत फक्त
स्वतःचं अस्तित्व पिऊन आभास

मला रस्त्यात दिसतं एक आयुष्य पिऊन
जळालेलं झाड
मी हसतो खदखदून
आणि गळून पडतो हसता हसताच
जळालेल्या झाडावरून.

कितिदा तरी बेतून आलेत
तुझ्या कपाळावरून कुंकू उचलून घ्यायला
माझ्या मृत्यूचे प्रसंग
पण स्वतःच जळताना पश्चात्तापात
ओतून गेले तुझ्या भरवशावर
तुला डगमगवून टाकणारा अंधार

तू अंधारालाही सांगितली सावित्रीची गोष्ट.

## परंपरा

कितिदा तरी वादळांनी भरचौकात
उडवून पाहिला तुझ्या वक्षावरचा पदर
तुला नागवं करण्यासाठी
पण त्यांचे दात आंबट झाल्यावर

तू वादळांनाही सांगितली द्रौपदीची गोष्ट

कितिदा तरी पहाताना वाहत्या पाण्यात
नशिबी दगडं पडल्याचं
कुणीकुणी गुणगुणलं तुझ्या कानात
पाणवठ्यावर

तू त्यांनाही अहिल्येची गोष्ट सांगताना
सांगितलं ' रामाच्या वाटेवर ' तुझं घर.

## निमित्त

पडवीत निजलेल्या
ढोंगी डोळ्यांची
पटली खूण

हसले का मी ?
कुणास ठाऊक
श्वास रोखून

घरातून दारी
गाण्यात रहात आले
तुला उरी झाकून घेताना
तुझ्या हिरव्या स्पर्शाचे
नुस्ते निमित्त झाले.

## पेरले गर्भात

पेरले गर्भात
सुप्त ज्वालामुखी
शाप पिटे टाळ्या
माप झाले दु:खी.

सरे वनवास
कोष फाटताना
आकाश झुकेला
समुंद्राचा पान्हा.

काळाचे हे बाळ
विष पचविते
तुला आणि मला
नित्य नाचविते.

## आपण सारे

आपण सारे
क्षणाचे साथी
तेल संपलेल्या
दिव्यातल्या वाती.

आपण सारे
शून्याचे प्रवासी
संपल्या दिवसांच्या
बिनहिशेबी राशी.

आपण सारे
मध्ये थांबणारे
मृत्युच्या वेशीला
फेकले जाणारे.

आपण सारे
आपलं काय जाणतो
इथे जन्मणाऱ्या
मेलेल्यांना वाणतो.

## दुःख मलूल गाणी

बाभळीच्या अंगावरून निथळतं
काटेरी गाणं. तुझ्या डोळ्यातली परतीची पाखरं
विसरून जातात; खोपटात जाणं

सायंकाळचे सगळेच मेघ
कोलमडून जातात शेतांवर
झाडं रोज आपल्यासारखीच—
उदासवाणी.

अंधाराच्या थडग्यावरती दुःखमलूल गाणी.

## सूर्याचं बोट

फक्त झेलीत राहावी
ओलीचिंब बरसात
कसे लपेटून घेऊ
त्याचे नवे नवे हात ?

कशी त्याच्या टाळू खुणा
मी ग जीवानं काफर
नको नको ते रेखते
मेंदी तळहातावर

असे आलेले कानाशी
त्याचे पेटलेले ओठ
आणि धरीले मी हाती
जसे सूर्याचेच बोट.

## तारुण्य

शब्द शब्द पिंजारून
माझ्या जिभेने कातले
प्रसवली अंगभरून
कवितांची शल्ये.

खंदकाचे पोटी
तट अंकुरले
शामियान्यामधी
मौन घुंगरू झालेले

ओळखीच्या वाटेवरी
अनोळखी पायखुणा
ह्याच पाऊलवाटांनी
मोडून ठेवल्या
माझ्या बंदुकींच्या माना

असे तसे हिंडताना
वाटांचीच हेळसांड
शरीरानं थकलो तरी
कवी आम्ही
कवितेत मात्र तरणेबांड.

२३२५ काव्य
२१९९३

## धूळ

मी पाठविणार नसतो माझ्यासोबत
संयमाचे तुटलेले साखळदंड
किंवा हजार आरशातल्या
माझ्याच प्रतिमांचे पराभूत सैन्य.

तुझ्यापर्यंत न पोहोचल्यानं
हृदयात तडफडणारे
पाठविणार नसतो डोळ्यांचे निरोप.

शिणगाराला थकवा येईपर्यंत
नाचतच असतेस तू
अशावेळी तुझ्यावर उधळून टाकावीशी
वाटते मला—
माझ्या रक्तमांसाची पेटलेली धूळ.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## चैतन्याचं लेणं

जागलेले डोळे कोवळे
अंधारावर रेखाटतात
तुझे रूप, नभाआड
शब्ददीप पेटवितात.

अंगभर फुटते पहाट
चैतन्याचं लेणं लेऊन
फुलांमध्ये स्वप्न माझे
नेसून रंग निघते न्हाऊन.

न सांगून परतलेली
तुझी स्वप्निल आकृती
पाठलाग करताना
तुझ्या प्रकटण्याची मनात भीती.

## गाणे

डोळ्यात डोळे
चांदण्यात न्हाताना
जात्यात मोती
टाकते पहाट
तुझ्या सारखीच
ओव्या गाताना

मांडीवर बाळ
स्तनांशी चाळे
पीठ भरताना
धुक्यात न्हातात
तुझेच....बाई ग,
तुझेच चुडे
—किलबिले होतात.

## उच्छ्वास

तमाम अरण्यांच्या रांगा
एका मागून एक सांडीत गेलो
समुद्रांच्या प्रदेशात.
तेव्हा कुठल्या कडेवर बसून
सूर्य होता पाण्यात न्हात.
आणि मी एका पक्षाच्या
पंखामधून माझे डोळे घेतले काढून
तेव्हा कोण्यातरी झाडाच्या शेंड्यावर
आभाळ आले ढळून.
भविष्याच्या चक्रात अडकलेला
पापण्यात होता ध्यास
त्यामागून धावत होता
दिवसांमागून दिवसाचा उच्छ्वास.

## अंधाराच्या आडोशाला

अंधाराच्या आडोशाला
तिची पाऊले वाजली
स्वप्नमंदिरात माझ्या
एक साऊली ओलेती.

अंधाराच्या आडोशाला
पेटलेली माझी व्यथा
क्षितिजाच्या रेषेवरती
टांगलेली रात आता.

अंधाराच्या आडोशाला
तिला पहाटून येता
कुठेतरी मनामध्ये
वेणू वाजवितो कान्हा.

## कुठे ?

निद्रिस्त पहाटे
अश्रूंचे धुके
धुराच्या स्वरांतून
कुठे बरे जाते ?

ढगांच्या उरातून
ओघळलेला पूर
नद्यांच्या बाहूतून
गेला कुठे दूर ?

## सूड

चंदनाचा चंद्र झुले
पांघरोनी गंध शाल
पहाटेच्या धुक्यामध्ये
तारकांचे तेज झेल

चंदनाचा मंद वारा
बांधलेला धुंद देही
स्वैर डोळे सैल हाका
पापण्यांना आग नाही

चंदनाचे अंतरंग
सांदलेले अंधतेने
जीवनाच्या हाती आले
नशिबाचा सूड घेणे

## निर्माता

कळी खुडताना आपणच
अर्पून द्यावे आपले हात
पहाटेच्या अंगावरची
अलगद ओढून घ्यावी कात

प्रकाशच प्रकाश
डोळ्यात भरून घ्यावा
ह्या स्वार्थी जगाचा
त्यात निर्माता पहावा

वाटेतल्या ठशांचे
शब्दशिल्प जपावे
कुण्या जाणत्याच्या हाती
जगणे मोजून द्यावे.

## भुकेला मारुती

दुष्काळ पडलेल्या गावातील
ओसाड पडलेल्या घरांना
महागाईच्या तेलावर
गावाबाहेच्या मारुतीला
राखण करणं परवडत नाही.

धोंडफळांना खाऊन
पोट त्याचं भरत नाही
देवळांना लाथा मारून
पडलेल्या भिंतीही पाहवत नाही.

पानाचा विडा ठेवणारे
वफादार चोरही दिसत नाहीत
मनाई तरी कशी करणार
गावातच काही नाही
भुकेशिवाय – दारिद्र्याशिवाय....

**खामोशी**

कुणी मेल्याचा निरोप—
अपशकून....
त्याच्या शेंडीलातरी
कुणाच्या सूडाची गाठ मारलेली
असते.
त्याच्यासाठी कुणी जान द्यायला
साथीदार, नंग्या तलवारी
उभ्या आहेत.

इथे काळ्याकुट्ट अंधारात
विंचवांच्या नांग्या
अंगअंग टिपताहेत
बोभाटा नाही....ना निरोप.

**अफवा**

अंधारात एकटी निजण्याआधी
माझ्या थडग्यावर
तुझ्या हाताने एक फूल ठेवून जा
अंगावरचे दगड जड झाले आहेत
स्मशानभूमीत तुझी अफवा नको.

*

**पाऊस**

पाऊस सुरू होतो तेव्हा
ती पेटविते दिवे
मिठीत घेतात तिला
विवस्त्र मेघांचे हात नवे नवे

काय चितारले म्हणजे हा दिवस
आठवणीत राहण्यासाठी
जाईल चितारला अगदी जसाच्या तसा ?

तुझे खुणावणारे डोळे तेवढे आकर्षक
रंगविले तर ?
थांबावेसे वाटेल का मावळत्या—
पाठमोऱ्या सूर्यालाही ?

मग हा दिवस चितारणं सहज शक्य
होईल नाही ?

## चित्र

फुलांच्या सावल्यांचे ताटवे ठेवावे
आडवायला वाट तर....
भलत्याच प्रतिमा उभ्या राहतात
एकटेपणात स्वतःला भिववायला.

काय चितारले म्हणजे तू चितारली
जाशील दिवसासकट मघाच्या
अगदी जशीच्या तशी ?

काहीएक उमजेनासं झालंय....
जे चित्रात घडवलं जातंय ते
रूप तुझं की माझं ?
का त्या पाठमोऱ्या दिवसाचं ?

## तुझे डोळे आठवतात

रस्ताच चुकतोय सगळा कुठेच काही दिसत
नाहीय

गंभीर काळोखात चालणं तेवढं चाललंय.
स्वतःशीच आदळले जाताहेत माझे हात
तेवढीच झाडा झाडांत सळसळतेय शुष्क जाग.
बुंध्याशी वाजतोय पाचोळा
म्हणजे ह्याच रस्त्याने गेला असेल गाणे सांडून
आपल्यासारखाच कुणी मुसाफिर वेडा.

पाय माझे आपसुक थरथरताहेत
अंगभर वाढतंय ओझं थकव्याचं
टेकडीवर टेकावी क्षणभर पाठ
तेवढीच जाणवतेय आईच्या स्तनांत
गोठलेली ममता.

मीच किती कठोर झालोय
वाऱ्याच्या वहाणा मागतोय
पूर्वी कधी पाहिलेले तुझे डोळे आठवतोय.

तो धावत येतो चऱ्हाट्यावर
आदळतो हात स्वतःशीच....मारतो हवेला लाथा.
फाडतो कपडे..विस्कटतो केस स्वतःचे
खिशातुन काढतो चाकू
भोकतो स्वतःच्या छातीत आणि
लुबाडतो सर्वस्व स्वतःचे

**आपण अगदी**
**गप्प असावं**

इकडे तिकडे पाहतात त्याचे लाल खुमारी—
डोळे. तो शिरतो एका हॉटेलात
प्लेटभर आम्लेटाचे ढेकर गळतात
त्याच्या गळ्यातून.

तो पडतो बाहेर हॉटेलातून
फेकतो एक नाणं पानबिड्याच्या टपरीत
सांगतो रक्त थोडं जास्त लावून
बनवायला पानाचा विडा.

आपण सगळं पाहून अगदी गप्प असावं.
आणि त्याच्या चेहऱ्यावर जाऊन हसावं.

## ती येते

मला ऐकू येतोय आवाज  टिकम  फावड्यांचा
दिसताहेत विजेसारखे लकाकणारे हात
कानांशी खोदताना
चहूकडे नुस्ताच काळोख
डोळ्यांपुढे भासांच्या बाहुल्या लटकविणारा.

उंडल्या जात आहेत काळजावर माझ्या
भीतीनं भरलेल्या टोपल्या
आणि बुजल्या जात आहेत
डोक्यात स्मृतींच्या सावल्या.

मी करतो प्रयत्न स्वतःला विसरण्याचा
ऐकतो गाणे स्वतःभोवती रेंगाळणारे
ती येते आणि एका खोल खड्ड्यातून
मला उचलून स्वप्नात नेते.

## माझा पत्ता

हरवलेल्या पायांच्या सापडतात वहाणा
सापडलेल्या वहाणांचे हरवतात पाय

दिसतात मला रस्त्यांच्या कडेकडेनं
निराश दुकानं माझ्या विक्रीवर बंदी घातलेले

मी थुंकतो रस्त्यावर ठिकठिकाणी
माझ्या बेचव इच्छा
तेव्हा मला भेटतो एक बिन् चेहऱ्याचा
माणूस. आणि विचारतो मला
माझे नांव, गाव,

मी उगारतो हांत आणि उधळून टाकतो
सगळे अभिनय
त्याचा चेहरा लागतो दिसू मला
आणि चेहऱ्यातल्या डोळ्यांत माझा पत्ता.

## घर

पटापट लावली जाताहेत दारं
मी वेढला गेलोय सहस्त्र आरशांनी

दिव्यांचा भिंतींच्याआड न संपणारा
काळोख उकरतोय उपवास

वळचणीतून ठिबकतेय एक एक अडचण
माझ्या अंगणात
दारावर थाप मारुन पडवितूनच
प्रकाश परतल्यासारखा होतोय भास

कुठूनतरी कुणी शिरावं आत काळजात
अशी कुठे सोयीची जागा नाहीय
शरीरभर
आणि मला माझ्यातून बाहेर
पडू द्यायचं नाकारतय
हे आरशातल्या आत्म्याचं नश्वर घर.

## तो कुठेही नसतो

ती पडलेली असते वाळूवर समुद्रकाठच्या
तिच्या डोळ्यात डुलक्या देणाऱ्या पाण्यासारखी
थकलेली प्रतिक्षा. आणि हृदयात
पसरून ओसरते कधी घेतलेली शपथ.

ती उकरते वाळू आणि बुडवते डोळे स्वतःचे
तरीही त्याचे सापडत नाहीत
कधी हरवलेले हात.

ती सांडून सर्वस्व होते नग्न
अगदी समुद्राइतकी
तो नसतो कुठेही
तिच्या ओठांच्या लाटा समुद्रभर गात
असतात.

## डोळ्यांवर डोळे

१

डोळ्यांवर डोळे गच्च
चुकले बिल्वरांचे सूर
तूच पेटविले आभाळ
आता होऊ कशी दूर ?

२

तुला झालंय तरी काय ?
देतो गुलाबाचं फूल
भांग भरायला पुरे
तुझ्या पावलांची धूळ

३

तू गाऊ नकोस आता
ते दोघांमधील गाणे
स्वप्नातल्या पाखरांना
जमू नये उडून जाणे.

## मृत्यू

सगळंच आपल्या मनासारखं घडलं पाहिजे
असं कधी म्हणू नये
जे घडणार असतं तेही घडायचं
राहून जातं अशाने.

मी बांधतो माझे हात सलामीच्या
संयोजनात कपाळावर
नशिबाने केलेला असतो कळप अरिष्टांचा
तिथेच.

सडल्यासारखे वाटतात माझ्या ओंजळीत
आदेश.
ओठांवर आहेत मिटर्स म्हणून
ठिबकत नसतात गढूळ निवेदने
भाष्य ते ही पूर्ण जंतुविरहीत क्षोभनाशक

अलिकडेच हाती आले आहे एक पिस्तुल
मी शोधतोय एका प्रेताच्या—
न्यायाचा मृत्यू
तो माझाही असेल म्हणून.

## अभिनय

छातीवरती हात ठेवूनी
श्वासांची ऐकावी जाग
अक्रोशाच्या अहंपणावर
विद्रोहाचे असती नाग

नश्वर निद्रेचा पडदा अन्
पलिकडे स्वप्नेही फसवी
सदैव हाती असूच द्यावी
अभिनयांची सोबत पिशवी

जर कां चुकलो जरा कुठे
ठेचून घ्यावे अपुले डोके
कढईतील रक्तात उकळत्या
तळून घ्यावे हृदयाचे ठोके.

## कीर्ति

कुणी कुणाचा नाही मालक
नाही कुणाचा कुणीही नोकर
शोक खोदतो भूक उदरी
जगविते मज एकच भाकर

धर्म जात ना ह्या हातांना
कुठले सोईर पायांनाही ?
कुठे जरासा ओरडलो तर....
मीच ठरतो आत्मद्रोही

सामान्यांशी सहज जमते
म्हणून मुतावे हितावरती
मरणाचाही जन्म होतो
हीच माझी अमर कीर्ति

## तंग तारांचे कुंपण

तंग तारांचे काटेरी कुंपण आहे सभोवती
माझ्या हाका थोपवणारं आंतल्या आंत
माझ्या छातीत सरपटताहेत अपमानाचे
जहरी साप.

मी दचकून फिरवतोय माझे संरक्षक
हात स्वतःभोवती.

कधी पक्षी बसतात काटेरी तारांवर
आणि नको ते गातात
मी म्हणत नाही वेडे त्यांना
मी आवळतो माझे अफाट पसरलेले पाय
तिने बांधलेले असतात घुंगरू आकाशात

मला फुटतात गाणी
तंग तारांच्या कुंपणावर काव्यांचे
शब्द होतात हिरवे.

**चांदणे**

शब्दांचे चांदणे
तिच्या डोळ्यात उतरते
काखेतल्या घागरी
ती आसवांनी भरते.

*

**कंदील**

शब्दांचे कंदील हातात घेऊन
ती कथाकादंबरीतून हिंडते
साठवायचे नसते अशावेळी
डोळ्यात ऊन. तिथेही तीच असते.

*

**डोळे**

अलवार अंधारावर
केसांचा भार
डोळ्यांतून डोळे
गेलेले आरपार

**कावळे**

अंगावरती ओढून अंधार
झाकतांना नग्नपण
पापण्यांवरचे कावळे
कोरून कोरून गिळतात मन.

*

**मी**

अंधार पोहायचं शिकते ती
पेटलेल्या आभाळात उभा मी

*

**स्तन**

काळोखात भिजलेलं
माझं एकाकी मन
डोळ्यांना टांगलेले
तिचे स्तन.

*

**तू**

पाखरांच्या चोचीत
भरतांना अंधार
फक्त तू....
हिरवीगार.

**वेण्या**

काळोखाच्या पलीकडे
तुझ्या पाऊलखुणांच्या
विराण्या
काळोखाच्या अलीकडे
उभा मी घेऊनी सूरांच्या
वेण्या.

*

**जेव्हा तू**

स्वयंपाक करतांना जेव्हा तू
फुंकतेस चूल
फुरफुरणाऱ्या जाळांत जसे
जुळतात माझेच सूर

**आरसा**

आकाशाचा भला मोठा आरसा
कफनामधल्या उताण्या
प्रेताला दिसतो तसा.

*

**प्रेयसीचे प्रश्न**

डोळ्यात मासे
पाळलेत कसे ?
बाभळीच्या वृक्षावर
का निजलेत ससे ?
हातात फुलं
आणलीत ताजी
तुझी रात
फक्त माझी

**सळसळ**

केळीची हिरवी सळसळ चाळते तिचे निळे डोळे
तेव्हा मी उभा राहतो ओळीत झाडांच्या
मुकाट्याने. कुठले अनोळखी हात
फिरतात सर्वांगभर माझ्या
मी नकळत बहरून येतो संपूर्ण

*

**दोन अश्रु**

संगीताच्या समुद्रावर
घोंघावणाऱ्या लाटातील
सूरांचे थवे.
तसे माझ्या डोळ्यात
एकदा तरी....
तिच्या फटकळ शब्दांनी
दोन अश्रू....गातांना यावे.

REFBK-0021993

**झाडाखाली**

झाडांनी आवळलय स्वतःच्या सावल्यांना
पायांखाली. आता काळोख गिळेल झाडांना
फांदी फांदीतून वाजतील भीतीची घुंगुरं
आणि तू ह्या फुलांच्या झाडाखाली
निजलेली ? तुझे कसे होईल बये ?
कुणीही दिसत नाहीय आसपास कुठे
आता मी सूर्य होऊन मावळू कां
तू चंद्र होऊन उगवतेस ?

*

**कधी कधी**

कधी अंधाराच्या कुशीत
प्रकाश बुडतो उजळण्यासाठी
तसा आधार घ्यावा तुझा
माझे मलाच विसरण्यासाठी.

* * *

पहाट
ऐंशी